विषय : सहकाराचा विकास

प्रकरण ४

भारतातील महत्त्वाच्या सहकारी संस्था

Important Cooperative Organizations in India

प्रा. महादेव कांबळे
सहाय्यक प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

नागरी सहकारी बँका: अर्थ व कल्पना

(UCB's Meaning and Nature)

'नागरी किंवा शहरी भागात नागरिकांना विविध बँकिंग सोई आणि सुविधा देण्याच्या हेतूने स्थापन झालेल्या बँकांना नागरी बँका असे म्हणतात.' या बँका सहकारी क्षेत्रात कार्य करतात. २० व्या शतकाच्या सुरुवातीस भारतात सहकारी क्षेत्राचा विकास सुरू झाला. पहिली नागरी सहकारी बँक १८८९ अन्योन्य सहकारी मंडळ या नावाने स्थापन झाली. १९०४ मध्ये पहिली नागरी सहकारी बँक मद्रास येथे स्थापन झाली. पतपुरवठा रचनेचा सहकारी तत्त्वावर विकास झाला आणि त्यांनी कृषी क्षेत्र आणि ग्रामीण भागाकडे आपले लक्ष केंद्रित केले. परंतु नागरी भागातील जनतेच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र अशी व्यवस्था नव्हती.

नागरी क्षेत्रातील मध्यमवर्गीय आणि बिगर शेतकरी वर्गाच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्थेची गरज भासत होती. त्यास अनुसरून नागरी भागात नागरी सहकारी बँका स्थापन करण्याची कल्पना पुढे आली. १९९५ मध्ये मॅक्लेगन समितीने नागरी भागातील वरिष्ठ व मध्यम वर्गातील लोकांना बँकिंग तत्त्वाची माहिती होण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने नागरी सहकारी बँका उपयुक्त ठरू शकतील असे स्पष्ट मत व्यक्त केले होते. १९३१ मध्ये बँकिंग चौकशी आयोगाने मर्यादित देयता असणाऱ्या सहकारी संस्था किंवा नागरी सहकारी बँका या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या बँका आवश्यक वातावरण असेल तेथे नागरी वर्गाच्या हितासाठी स्थापन कराव्या असे सुचविले. त्यामुळे नागरी सहकारी बँकांच्या विकासास चालना मिळाली. १९६५ नंतर रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांचा देशात प्रसार होण्याच्या दृष्टीने अशा बँकांना शाखा काढण्याची परवानगी देण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे या बँकांच्या विकासास चालना मिळाली.

नागरी सहकारी बँकांचे प्रकार (Types of UCB's)



१. अनुसूचित / बिगर अनुसूचित बँका :

रिझर्व्ह बँक कायदा १९३४ अंतर्गत दुसऱ्या अनुसूचित समावेश असणाऱ्या बँकांना अनुसूचित बँका म्हणतात. सदर कायद्यांतर्गत कलम ४२ (६) (ए) अंतर्गत नमूद अटींची पूर्तता करणे यासाठी आवश्यक असते. सदर कलमानुसार बँकेचे जमा अथवा गोळा केलेले भागभांडवल आणि स्वनिधी हा पाच लाखांपेक्षा कमी असू नये. तसेच बँकेचे कामकाज हे ठेवीदारांच्या हितास हानिकारक ठरणारे असता कामा नये. सदर अटीनुसार भारतात एकूण ५४ नागरी सहकारी बँका या अनुसूचित असून, १५०८ बँका या बिगर अनुसूचित आहेत.

२. एक राज्य/बहुराज्य बँका :

एकापेक्षा जास्त राज्यात कार्यविस्तार अथवा शाखा विस्तार असणाऱ्या व त्यासाठी बहुराज्य सहकारी संस्था कायदा २००२ (Multi State Co-operative Societies Act 2002) अंतर्गत नोंदणीकृत बँकांना बहुराज्य नागरी सहकारी बँका म्हणतात. याउलट, केवळ एकाच राज्यात कार्यक्षेत्र असणाऱ्या व त्या राज्यातील लागू सहकारी संस्था कायद्यांतर्गत नोंदणीकृत नागरी सहकारी बँका या एक राज्य या प्रकारात येतात.

बँकेने स्तर एक व स्तर दोन बँका : नागरी सहकारी बँकांच्या नियमनासाठी रिझर्व्ह सदर बँकेचे स्तर एक (Tier I) आणि स्तर दोन (Tier II) असे दोन प्रकार केले आहेत. स्तर एक मध्ये समाविष्ट बँकांना पुढील अटी लागू होतात.

(अ) १०० कोटी रुपयांपेक्षा कमी ठेवी असणाऱ्या व एकाच जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या बँका.

(ब) १०० कोटी रुपयांपेक्षा कमी ठेवी असणाऱ्या बँका एकापेक्षा जास्त जिल्ह्यात कार्यरत असतील जेंव्हा अशा बँकेची शाखा लगतच्या जिल्ह्यात असेल व अशा शाखांमधील एकत्रित ठेवी व अग्रिमांचे प्रमाण स्वतंत्ररित्या एकूण ठेवीं व अग्रिमांच्या किमान ९५% असेल.

(क) जिल्हा पुनर्रचनेमुळे एकापेक्षा अधिक जिल्ह्यात कार्यविस्तार झालेल्या मात्र मूलत: एकाच जिल्ह्याचे कार्यक्षेत्र असणाऱ्या बँका ज्यांच्याकडील एकूण ठेवी १००. कोटी रुपयापेक्षा कमी असतील.

नागरी सहकारी बँकांचे व्यवस्थापन

(Management of UCB's)

नागरी सहकारी बँकांचे व्यवस्थापन हे सदर बँकेला लागू असणारे संबंधित राज्यांचे सहकारविषयक कायदे, बँकिंग नियमनविषयक कायदे तसेच अशा बँकेचे पोटनियम यांना अनुसरून केले जाते.

बँकेच्या सर्वसाधारण सभेत बँकेच्या सभासदांनी निवडलेल्या संचालक मंडळामार्फत बँकेचे व्यवस्थापन केले जाते. लागू कायद्यांना अनुसरून संचालक मंडळाची निवड ही एक वर्ष, तीन वर्षे अथवा पाच वर्षांसाठी करण्यात येते.

बँकेचा कारभारविषयक सर्वोच्च अधिकार हे बँकेच्या सभासदांकडे असले तरीही सभासद हे बँकेच्या दैनंदिन कारभारात भाग घेत नसल्यामुळे हे काम त्यांच्या वतीने संचालक मंडळ पार पाडते.

नागरी सहकारी बँकेची व्यवस्थापकीय रचना :

नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात मागील काही काळात उघडकीस आलेल्या आर्थिक घोटाळ्यांमुळे तसेच वाढलेल्या आर्थिक व व्यवस्थापनाशी निगडित अनियमिततेमुळे भारतीय रिझर्व्ह बँकेने भारतातील बँकिंग नियामक या नात्याने ३१ डिसेंबर, २०१९ रोजी जारी केलेल्या दिशा निर्देशानुसार नागरी सहकारी बँका या सार्वजनिक ठेवी स्वीकारत असल्यामुळे ठेवीदारांच्या संरक्षणासाठी नागरी सहकारी बँकांच्या एक सहकारी संस्था तसेच एक बँकिंग संस्था या अर्थाने चालणाऱ्या कार्याचे नियमन आणि पर्यवेक्षण करण्यासाठी संचालक मंडळापासून स्वतंत्ररित्या कार्यरत असणाऱ्या व्यवस्थापन मंडळाची निर्मिती करण्यासाठी सांगितले आहे.

व्यवस्थापन मंडळाच्या निर्मितीसाठी रिझर्व्ह बँकेने निर्देशित केलेले नियम पुढीलप्रमाणे

१. शंभर कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या ठेवी असणाऱ्या नागरी सहकारी बँकांना व्यवस्थापन मंडळाची निर्मिती करणे अनिवार्य असेल, त्याखेरीज त्यांना नवीन शाखा उघडण्यासाठी रिझर्व्ह बँकेची परवानगी प्राप्त होणार नाही.

२. व्यवस्थापन मंडळ निर्मितीसाठी नागरी सहकारी बँकांना आपल्या पोट नियमांमध्ये आवश्यक ते बदल करून त्याला बँक सभासद तसेच सहकारी बँक निबंधक यांची मान्यता घ्यावी लागेल. व्यवस्थापन

३. व्यवस्थापन मंडळाची निर्मिती संचालक मंडळाद्वारे केली जाईल, मंडळात कमीतकमी ५ ते जास्तीतजास्त १२ सदस्य नेमता येतील.

४. व्यवस्थापन मंडळ हे संचालक मंडळाप्रति जबाबदार असेल.

५. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार व्यवस्थापन मंडळात समाविष्ट होणारी व्यक्ती ही बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच या क्षेत्रातील कामाचा प्रत्यक्ष अनुभव असणारी व नागरी सहकारी बँकांच्या कार्याचे व्यावसायिक पद्धतीने व्यवस्थापन करू शकेल अशी असेल.

६. व्यवस्थापन मंडळाचा प्रमुख अथवा अध्यक्षाची नेमणूक सदर मंडळातील सदस्य अथवा संचालक मंडळाद्वारे केली जाईल.

७. भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या सदर दिशानिर्देशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या मुदतीत नागरी सहकारी बँकांनी सदर दिशानिर्देशांचे पालन करणे आवश्यक असेल.

८. नागरी सहकारी बँकांच्या कार्यावरील देखरेख, संचालक मंडळाला बँके संबंधित धोरणे निश्चितीसाठी मदत करणे, अनुत्पादक कर्जाचे व्यवस्थापन, कर्जे आणि निधीचे योग्य व्यवस्थापन इत्यादी कार्ये व्यवस्थापन मंडळाला करावी लागतील.

१३.५ भारतातील नागरी सहकारी बँकांची प्रगती (Progress of UCB's)

निर्देशक	२०१४	२०१५	२०१६	२०१७	२०१८	२०१९
नागरी सहकारी बँकांची संख्या	१५८९	१५७९	१५७४	१५६२	१५५१	१५४४
दायित्वे						
१. भांडवल	८९.७२	९९.५४	११०.०७	१२१.६३	१२९.७०	१३५.८२
२. राखीव व अधिशेष	२४३.५३	२७३.७५	२९५.८०	३३५.२७	३५२.८८	३७७.८८
३. ठेवी	३,१७७.६९	३,५५१.३४	३,९२१.७६	४,४३४.६८	४,५६५.०६	४,८४३.१५
४. कर्ज	२५.५२	२२.४६	२६.१५	३३.९६	४९.९५	५२.४१
५. इतर उत्तरदायित्व आणि तरतुदी	३७६.८२	४०४.८९	४३६.५७	४७३.४९	५३४.९०	५८२.८४
एकूण देयता	३,९१३.२९	४,३५१.९७	४,७८८.२४	५,२९९.०३	५,६३२.५१	५,९९२.१३
मालमत्ता						
१. रोख रक्कम	३३.८०	३७.७४	४२.३१	४४.८५	५४.६३	५३.८७
२. आरबीआय शिल्लक	८९.२३	९७.२४	१०१.६३	११४.६८	१२५.०३	१३७.७८
३. बँक शिल्लक	२९२.९१	३५८.५४	५५९.७७	६०७.२२	६२९.६८	६०८.४५
४. मागणी देय पैसा	१४.७२	१९.८५	३२.५५	५०.४७	४४.६१	५८.७१
५. गुंतवणूक	१,१५३.१०	१,२३१.०७	१,२०९.११	१,४२०.४५	१,४९८.३३	१,५६९.४३
६. कर्ज (प्राप्य) व अग्रिमे	२,००३.५२	२,२४३.२९	२,४४९.३६	२,६१२.२५	२,८०४.५९	३,०३०.१७
७. इतर मालमत्ता	३२६.००	३६४.२५	३९३.५२	५४९.११	४७५.६०	५३३.७०
एकूण मालमत्ता	३,९१३.२९	४,३५१.९७	४,७८८.२४	५,२९९.०३	५,६३२.५१	५,९९२.१३

(आकडेवारी अब्ज रुपयांमध्ये)

लेखापरीक्षणानंतर प्राप्त वर्ग	संख्या
A	२८६
B	९१३
C	२७५
D	७०

धोक्याचे भांडवलाशी प्रमाण	संख्या
CRAR > 3	३८
3 to 6	७
6 to 9	१४
9 to 12	१५६
12 > CRAR	१३२९

भारतातील नागरी सहकारी बँकांच्या वाटचालीचा मागील काही वर्षांतील उपलब्ध आकडेवारीच्या आधारे आढावा घेत असताना ठळकपणे लक्षात येणारी गोष्ट म्हणजे सदर बँकांची घटत चाललेली संख्या होय. सन २००४ मध्ये १९२६ इतकी असलेली नागरी सहकारी बँकांची संख्या २०१९ मध्ये घटून १५४४ इतकी राहिलेली आहे. वित्तीय अनियमितता, आर्थिक घोटाळे तसेच भांवडल कमतरता अशा अनेक कारणांमुळे भारतातील नागरी सहकारी बँकांची संख्या प्रतिवर्षी घटत चाललेली आहे.

नागरी सहकारी बँकांच्या एकत्रित ताळेबंदाचा आढावा घेतल्यास दायित्वे आणि मालमत्ता यामध्ये समाविष्ट प्रत्येक घटक हा वाढ दर्शवितो आहे. नागरी सहकारी बँकांनी दर्शविलेले अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाणसुद्धा मागील काही वर्षात नियंत्रणात येत असल्याचे दिसून येत आहे. नागरी सहकारी बँकांच्या लेखापरीक्षणानंतर त्यांना प्राप्त होणारा वर्ग विचारात घेतल्यास २०१९ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार देशातील २८६ नागरी सहकारी बँका 'अ' वर्ग प्राप्त करू शकल्या आहेत, तर ९१३ बँकांना 'ब' वर्ग मिळाला आहे. बँकांना प्राप्त होणारा वर्ग हा बँकेची एकूण आर्थिक व वित्तीय सक्षमता दर्शवितो.

या अनुषंगाने विचार करता नागरी सहकारी बँकांची स्थिती समाधानकारक दिसून येत आहे. रिझर्व्ह बँक बँकिंग संस्थांसाठी ठरवून दिलेल्या भांडवलाचे धोक्याशी असणारे प्रमाण जे किमान ९% असणे आवश्यक आहे. या निकषाचा विचार करता नागरी सहकारी बँकांची स्थिती चांगली असल्याचे दिसून येत आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार देशातील १३२९ बँकांनी सदर प्रमाण हे १२% पेक्षाजास्त ठेवलेले आहे. १५६ बँकांचे प्रमाण हे ९ ते १२% मध्ये असून ९% पेक्षा खाली प्रमाण असणाऱ्या बँकांची संख्या ही केवळ ५९ इतकी आहे. या अर्थाने भारतातील नागरी सहकारी बँका या भांडवल पर्याप्तदृष्ट्या सक्षम आहेत असे म्हणता येते.

नागरी सहकारी बँकांच्या समस्या (Problems Faced by UCB's)

व्यवसायांतर्गत समस्या

१. व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव :

आधुनिक काळानुसार बँकिंग सेवा व काम करण्याच्या पद्धतींचे आधुनिकीकरण तसेच व्यवसायवाढीसाठी आक्रमक धोरण व गोष्टी केवळ बँक संगणकीकरणापर्यंतच मर्यादित राहिलेल्या आहेत. सदर बँकांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत पात्रता, निवड व प्रशिक्षण या बाबतीत ठोस धोरण अस्तित्वात नाही. बऱ्याचदा संचालक मंडळातील व्यक्तींच्या मर्जीतील लोकांची कर्मचारीपदी नेमणूक केली जाते. अकुशल कर्मचारी वर्ग तसेच पारंपरिक व्यवस्थापन पद्धतींमुळे सदर बँका अकार्यक्षम बनल्या आहेत.

२. सभासदांचे प्रशासकीय कार्यातील दुर्लक्ष :

नागरी सहकारी बँकांचे सभासद हे बऱ्याचदा संस्थेपासून अलिप्त राहतात व संस्था कार्यात फारसा रस घेत नाहीत. बँकांच्या वार्षिक सभात अथवा मतदानावेळीही फार कमी संख्येने सभासद हजेरी लावतात. या गोष्टीचा परिणाम संस्थेवर निवडक व्यक्तींचीच पकड निर्माण होण्यात होत असतो. बऱ्याच नागरी सहकारी बँकांत केवळ कर्ज मिळविण्यासाठी व्यक्ती सभासद होतात. या सर्व गोष्टींचा परिणाम सभासदांचा संस्था कार्यावरील वचक कमी होण्यात होत असतो.

३. कर्ज वाटपातील गैरप्रकार :

नागरी सहकारी बँकांतून होणारे कर्जवाटप हे बहुतेक वेळेला राजकीय दबाव, संचालकांचे हितसंबंध अशा कारणांतून होते. कर्जवाटप करताना बऱ्याचदा सक्षम तारण तसेच कागदपत्रांची संपूर्ण तपासणी अशा गोष्टींकडे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे अशा कर्जाची वसुली ही बँकांपुढील मोठी समस्या बनली आहे. बँक निधीचा मोठ्या प्रमाणात न्हास करण्यास ही कर्जे कारणीभूत ठरत आहेत.

४. आर्थिक सुदृढतेचा अभाव आणि निधी कमतरता

भारतात नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात काम करणाऱ्या काही मोजक्याच बँका आज आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. अपुरी सभासद संख्या, ठेवी गोळा होण्याचे कमी झालेले प्रमाण, वेळेत वसूल न होणारी कर्जे, आर्थिक व्यवस्थापनाचा अभाव तसेच पर्यायी निधी उभारणी मार्गाची कमतरता या सर्व गोष्टींमुळे आज अनेक सहकारी बँकांचा भांडवली पाया कमकुवत बनला आहे. तसेच अपुऱ्या खेळत्या भांडवलाचीही समस्या निर्माण झाली आहे.

५. खर्चाचे वाढते प्रमाण :

प्रभावी आर्थिक व्यवस्थापनाच्या अभावी नागरी सहकारी बँकिंग सेवांसाठी येणाऱ्या खर्चाचे प्रमाण अधिक आहे. सदर बँकांमध्ये कर्मचारी वर्गसुद्धा बरेचदा गरजेपेक्षा जास्त नेमलेला आढळतो. संचालक मंडळ तसेच सभासदांच्या वार्षिक सभामध्येसुद्धा अनेकदा मोठ्या प्रमाणात पैशाचा अपव्यय केला जातो. त्यामुळे मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणाचा विचार करता सदर बँकांमध्ये अनुत्पादक कार्यावर मोठा खर्च केला गेलेला आढळतो.

६. अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण व अपुरी वसुली यंत्रणा :

कर्जवाटपात सुरक्षिततेच्या तत्त्वांकडे करण्यात आलेल्या दुर्लक्षामुळे नागरी सहकारी बँकांनी वाटप केलेली कर्जे थकण्याचे प्रमाण मोठे आहे. राजकीय अथवा संचालक मंडळावरील व्यक्तींच्या दबावाने कर्जे बुडविण्याचे प्रमाणही या बँकांत मोठे आहे. नागरी सहकारी बँकांत संचालक अथवा त्यांच्या नातेवाइकांनी दबाव व गैरप्रकाराद्वारे बँकांतून मोठ्या रकमेची कर्जे काढून ती बुडीत दाखविण्याची अनेक उदाहरणे आज या क्षेत्रात घडताना दिसून येत आहेत. अपुरे तारण तसेच परतफेड क्षमता नसणाऱ्या व्यक्तींनाही होणाऱ्या कर्जवाटपामुळे नागरी सहकारी बँकांपुढे अनुत्पादक मालमत्ता अथवा थकीत कर्जाची फार मोठी समस्या उभी आहे.

व्यवसायबाह्य समस्या

१. शासकीय हस्तक्षेप:

भारतातील सहकारी चळवळ ही मुळी शासकीय पाठबळामुळेच उभी राहिली आहे. त्यामुळे शासकीय धोरणे राबविण्याची एक यंत्रणा म्हणूनच सहकारी संस्थांकडे पाहिले जाते. सहकारी बँकांना कर्जवाटप करताना आज शासनाने ठरविल्याप्रमाणे अग्रहक्क क्षेत्रांना निश्चित प्रमाणात पतपुरवठा करावा लागतो. व्यापारी बँकांप्रमाणे या क्षेत्रातील बँकांना व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य नाही. या संस्थांच्या आर्थिक धोरणांवर बऱ्याचदा शासकीय निर्णयांचे प्रतिबिंब पडलेले असते. या गोष्टी नागरी सहकारी बँकांच्या विकासाला बाधक ठरत आहेत.

२. दुहेरी नियंत्रण :

भारतात नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राची आजपर्यंत वाटचाल ही दुहेरी नियंत्रणाखाली झाली आहे. नोंदणी, व्यवस्थापन, एकत्रीकरण, अवसायन अशा कार्यासाठी सहकारी संस्था निबंधक तर बँक चालविण्याचा परवाना, व्याजदर, कर्ज व गुंतवणूक धोरणे इत्यादींसाठी भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या नियंत्रण व पर्यवेक्षणाखाली या बँकांना काम करावे लागत होते. सदर नियंत्रण करणाऱ्या संस्थात परस्पर सामंजस्याचा अभाव तसेच एकमेकांच्या धोरणांशी विसंगत नियम यांच्या कात्रीत नागरी सहकारी बँकांना काम करावे लागत होते. नागरी सहकारी बँकांच्या व्यवसायविषयक धोरणांवर या नियंत्रणामुळे अनिश्चिततेचे सावट निर्माण होत होते.

३. बँकिंग क्षेत्रातील वाढती स्पर्धा :

देशात बँकिंग क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. परंतु आक्रमक व्यावसायिक धोरण व शाखाविस्तार यामुळे राष्ट्रीयीकृत व खाजगी क्षेत्रातील बँका आज नागरी सहकारी बँकांशी स्पर्धा करू लागल्या आहेत. आर्थिक, मानवी संसाधन तसेच व्यावसायिक व्यवस्थापनाच्या बाबतीतही या बँका नागरी सहकारी बँकांपेक्षा अनेक पटींनी सरस आहेत. आर्थिक व वित्तीय सेवा पुरवठ्यातसुद्धा नागरी बँका स्पर्धक बँकांपेक्षा मागे पडलेल्या आहेत. या तीव्र स्पर्धेचा नागरी सहकारी बँकांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होतो आहे.

४. ठेवीदार व सामान्य नागरिकांचा कमी होणारा विश्वास :

कर्जवाटपातील गैरव्यवहार, आर्थिक घोटाळे, फुगविलेला ताळेबंद तसेच संचालकांची मनमानी या गोष्टींमुळे नागरी सहकारी बँकिंग क्षेत्र आज चर्चेचा विषय बनले आहे. मध्यंतरीच्या काळात एकापाठोपाठ एक बंद पडलेल्या सहकारी बँका व त्यामुळे त्यात पैसे गमावलेल्या ठेवीदारांच्या व्यथा टी. व्ही., वर्तमानपत्रे या माध्यमातून सामान्यलोकांपुढे सतत मांडल्या जात आहेत. या गोष्टीचा परिणाम आज सर्वसामान्य माणसाचा नागरी सहकारी बँकांवरील विश्वास कमी होण्यात झाला आहे. नागरी सहकारी बँकांत आपले पैसे सुरक्षित राहतील असे आज लोकांना वाटत नाही.. त्यामुळे हा गमावलेला विश्वास आपल्या कामाने पुन्हा मिळविण्याचे फार मोठे आव्हान आज नागरी सहकारी बँकांपुढे उभे आहे.

उपाययोजना (Remedies to Problems)

नागरी सहकारी बँकांपुढील समस्यांवर खालील उपाययोजना करता येते.

१. स्थापना करताना घ्यावयाची काळजी : नागरी सहकारी बँका या एक लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांमधून निर्माण केल्या जाव्यात. तसेच त्यांचे कार्यक्षेत्र हे शहर किंवा जिल्ह्यापुरते मर्यादित असावे. त्यामुळे स्थानिक लोकांशी संपर्क ठेवून बँकिंग व्यवसाय वाढविता येईल.

२. शासनाचा सहभाग : राज्य शासनाने या बँकांना सुरुवातीच्या काळात भांडवलाचा पुरवठा करावा. परतीच्या भागांच्या स्वरूपात हे भांडवल विनामोबदला पुरवावे. त्यामुळे या बँकांची आर्थिक शक्ती वाढण्यास मदत होईल.

३. ठेवीत वाढ : या बँकांनी आपल्याकडे अधिकाधिक ठेवी आकर्षित करण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे बँकांकडील निधीत वाढ होण्यास मदत होईल. त्यामुळे बँकांना व्यवहारात वाढ करणे शक्य होईल. बँकांनी जनतेशी सतत संपर्क ठेवून आणि सभासदांशी ठेवी गोळा करण्याच्या दृष्टीने संपर्क ठेवून खात्यांची संख्या आणि ठेव वाढविण्यावर लक्ष द्यावे.

४. कर्ज वाटप कार्यात सुधारणा : समाजातील लहान उद्योजक, व्यापारी, किरकोळ दुकानदार यांच्या कर्ज पुरवठ्यावर या बँकांनी लक्ष केंद्रित करावे तसेच पगारदार सभासदांना किमती वस्तू हप्ते व भाडेबंद पद्धतीने खरेदी करण्यासाठी कर्जे द्यावीत. अनुत्पादक कारणासाठी कर्जे देणे टाळावे. मोठ्या व्यापारी व उद्योजकांना अधिक कर्जे देण्यावर भर देऊ नये.

५. कार्यात्मक सुधारणा : बँकांतील सेवकवर्गांनि कार्यक्षम कार्यपद्धती स्वीकारून ग्राहक वर्गास अधिक आपलेसे करावे. प्रशिक्षित व अनुभवी सेवकवर्गाची भरती करण्याकडे अधिक लक्ष दिले जावे.

६. सेवकवर्गास प्रशिक्षण : बँकांद्वारे कर्मचारी वर्गास प्रशिक्षण आणि उजळणी प्रशिक्षण देण्यावर भर देण्यात यावा. त्यामुळे कार्यक्षमता वाढीत मदत होईल.

७. शाखाविस्तारावर बंधने :

नागरी बँकांच्या शाखांचा विस्तार मोठ्याप्रमाणात होत असून ईर्षेपाटी बँकांच्या शाखा उघडल्या जात आहेत. नागरी सहकारी बँकांना राष्ट्रीयीकृत बँकांद्वारे मोठ्या प्रमाणात स्पर्धा होत असल्याने बँकिंग व्यवसाय होण्याची शक्यता असणाऱ्या ठिकाणीच शाखा काढण्यास परवानगी द्यावी. तसेच बँकांना बँकिंग क्षेत्राबाबत जे निकष ठरवून दिले आहेत त्याचे कसोशीने पालन करणाऱ्या बँकांनाच शाखा उघडण्याची परवानगी दिली जावी.

८. सेवांत सुधारणा : बँकांच्या कार्यात सतत वाढत होत आहे. त्यासाठी बँका नवनवीन कल्पना लढवत आहेत. नागरी बँकांनी आपल्या सेवात विविधता आणावी. ए. टी. एम., कोअर बँकिंग, सुरक्षा गृहाची सोय इत्यादी सेवांची नागरी भागातील जनतेला आवश्यकता असते. अशा आणि अन्य सेवा सुरू कराव्यात.

९. व्यवसायात व्यावसायिकता आणणे : या बँकांनी आपल्या कार्यात व्यावसायिकता आणावी. कर्मचाऱ्यांना संगणक आणि 'ई' बँकिंगचे प्रशिक्षण देणे, कर्जवाटप प्रक्रिया सुलभ करणे, कर्जवाटप विविधता आणणे, कर्जे परतीच्या निकषावर देणे, कर्जवसुलीसाठी विविध मार्ग वापरणे, खर्चाचे प्रमाण कमी करणे इत्यादी बाबींकडे लक्ष दिले पाहिजे..

बिगर कृषी सहकारी पतसंस्था

(Non- Agriculture Credit Co-operatives)

बिगर कृषी कारणांसाठी सहकारी तत्त्वावरील पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या निर्मितीच्या इतिहासाचा विचार करता जगामध्ये जर्मनी आणि इटली या देशांत एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात अशा प्रकारच्या पतपुरवठा करणाऱ्या संस्थांचीस्थापना झाल्याचे दिसून येते. जर्मनी येथे 'फ्रांत्झ शुल्टझ यांनी १८५२ मध्ये डेलिट्झसच येथे सहकारी तत्त्वावरील अशा प्रकारची पहिली नागरी पतपुरवठा संस्था स्थापन केलेली दिसून येते. तर इटली येथे 'प्रा. लुईगी लुझ्झाटी' यांनी १८६४-६५ मध्ये लोडी येथे परस्परांच्या मदतीवर आधारित पतपुरवठा संस्थेची निर्मिती केली, ज्याचे पुढे सहकारी बँकेत रूपांतरण झाले.

तत्कालीन भारतातील सहकारी संस्था कायदा १९०४ नुसार मद्रास प्रांतातील कांजीवरम येथे देशातील पहिल्या नागरी सहकारी पतपुरवठा संस्थेची नोंदणी झाली. यानंतर मुंबई तसेच म्हैसूर या तत्कालीन इलाख्यात अशा प्रकारच्या सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना झाल्याचे दिसून येते. प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धाच्या काळानंतर भारतात नागरी क्षेत्रातील सहकारी पतपुरवठा संस्थांचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला दिसून येतो. १९४६ साली स्थापन करण्यात आलेल्या सहकारी नियोजन समिती'नेसुद्धा अल्प उत्पन्न गटातील नागरी लोकसंख्येसाठी अशा प्रकारच्या संस्थेची प्रत्येक गावात निर्मिती करण्याची शिफारस केली होती.

भारतातील सहकारी पतपुरवठा रचनेतील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांचे स्थान



नोकरदारांच्या पतपुरवठा संस्था बिगर कृषी सहकारी पतसंस्थांचे कार्यक्षेत्र हे नागरी तसेच ग्रामीण भागात असू शकते त्यानुसार सदर संस्थांना आपल्या नामावलीत नागरी अथवा बिगर कृषी या शब्दांचा समावेश करावा लागतो.

बिगर कृषी सहकारी पतसंस्थांची कार्ये (Functions of NACC)

१. सभासदांकडून ठेवी गोळा करणे :

बिगर कृषी सहकारी पतसंस्था या पतपुरवठा संस्था असल्याने सभासदांना कर्जपुरवठा करण्यासाठी त्यांना निधीची आवश्यकता असते. सदर निधीचा सर्वांत मुख्य स्रोत म्हणजे अशा संस्थेनेसभासदांकडून निरनिराळया आकर्षक योजनांखाली जमा केलेल्या ठेवी हा असतो. अशा प्रकारे ठेवी गोळा करणे हे सदर संस्थांचे प्रमुख कार्य आहे. बचत खाते, मुदत ठेव खाते, आवर्ती ठेव खाते यासोबतच संस्थेद्वारे निर्मित आकर्षक व्याजदरांच्या विविध योजनांतर्गत जसे शुभेच्छा ठेव खाते, दामदुप्पट ठेव खाते, लखपती योजना इत्यादी. संस्थेद्वारे ठेवी गोळा केल्या जातात.

२. कर्ज देणे :

सभासद वर्गाच्या दैनंदिन, व्यावसायिक वा आकस्मिक गरजेतून निर्माण होणाऱ्या कर्जपुरवठाविषयक गरजांची पूर्तता सामान्यत: इतर बँकिंग संस्था अथवा पतपुरवठा संस्थांद्वारे वेळेत होणे हे दुरापास्त व किचकट असते. अशा वेळी सदर गरजांची पूर्तता बिगर कृषी सहकारी पतसंस्थाद्वारे केली जाते. यामध्ये सभासदांना अल्पमुदतीची व छोट्या रकमेची कर्जे ही बऱ्याचदा वैयक्तिक हमीवर, विनातारण उपलब्ध करून दिली जातात. सदर संस्थांद्वारे करण्यात येणाऱ्या कर्जपुरवठा प्रकारात वैयक्तिक कर्ज, वाहन तारण कर्ज, गृह कर्ज, मालमत्ता गहाण कर्ज, सोने तारण कर्ज, मुदत ठेव तारण कर्ज अशा कर्ज प्रकारांचा समावेश होतो.

३. सभासदांना बचत व काटकसरीची सवय लावणे

आपण वर पाहिल्याप्रमाणे बिगर कृषी सहकारी पतसंस्थांचे सभासद हे प्रामुख्याने अल्प व मध्यम उत्पन्न गटातील असल्याने अशा वर्गाला त्यांच्या मिळणाऱ्या उत्पन्नातून बचत करावयास लावणे हे काम कठीण आहे. यामुळेच अशा सभासद वर्गाने केलेली छोटी बचतसुद्धा गोळा करणे हे महत्त्वाचे ठरते. या अनुषंगाने बिगर कृषी सहकारी पतसंस्थाद्वारे राबविण्यात येणाऱ्या पिग्मी योजना या परिणामकारक ठरत असल्याचे दिसून आले आहे. येथे पतसंस्थांद्वारे नेमलेले पिग्मी एजंट हे सभासदांकडे जाऊन त्यांच्याकडून त्यांनी केलेल्या अल्प बचती गोळा करण्याचे काम करतात. यातूनच सभासदांना काटकसरीची व बचत करण्याची सवय लागते व याचा फायदा सभासदांना त्यांच्या भविष्यकालीन आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी होऊ शकतो.

४. लाभांश वाटप :

बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी प्रति आर्थिक वर्षात आपल्या व्यावसायिक उलाढालीतून मिळवलेल्या नफ्यातील हिस्सा लाभांश रूपात आपल्या सभासदांना देणे हे सदर संस्थांचे एक कार्य आहे. सदर संस्थांची निर्मिती ही सभासदांनी पुरविलेल्या भांडवलाच्या आधारावर झालेली असल्याने अशा भांडवलावर मिळालेल्या लाभाचे वाटप सभासदांमध्ये कायदेशीर तरतुदी व संस्थेच्या पोटनियमांचे पालन करून संस्थेद्वारे केले जाणे अपेक्षित असते.

५. सभासदांना दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा पुरवठा करणे :

संस्था सभासदांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा बाजारातील दरापेक्षा कमी दराने पुरवठा करण्याचे कार्य बिगर कृषी सहकारी संस्था करतात. बाजारातील दराने बस्तू खरेदी करण्यात येणाऱ्या खर्चातील बचत करणे हा त्यामागील उद्देश असतो. मात्र सध्याच्या काळात अपवादात्मक रीतीनेच सदर कार्य अशा संस्थांद्वारे केले गेल्याचे दिसून येते.

६. सभासदांना उपयुक्त सेवांचा पुरवठा करणे :

बँकिंग संस्थांप्रमाणेच बिगर कृषी सहकारी संस्था सभासदांकडून ठेवी घेणे व त्यांना कर्जे देणे या प्राथमिक कार्या शिवाय, इतर अनेक प्रकारची दुय्यम कार्य करतात. यामध्ये सभासदांना पुरविण्यात येणाऱ्या विविध उपयुक्तता सेवांचा समावेश होतो. सदर संस्थांद्वारे सभासदांना पुरविण्यात येणाऱ्या काही उपयुक्त सेवा पुढीलप्रमाणे

(अ) सभासद व ग्राहक यांच्यासाठी वीज बिल भरणा केंद्र संस्था शाखा चालविणे.

(ब) सभासदांना त्यांच्याकडील मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी सुरक्षा ग्रहाची सोय करणे.

(क) सभासदांसाठी निवृत्ती वेतन योजना राबविणे.

(ड) सभासदांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेणे.

(इ) उद्योजकता विकास, महिला विकास, कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे.

(फ) कर्जदार व सभासदांना विमा संरक्षण देणे.

(ग) होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.

(ह) बँकिंग क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त सेवा जसे निधी हस्तांतरण, मोबाईल बँकिंग, एटीएम अशा सेवा सभासद व ग्राहकांना पुरविणे..

(य) सभासदांच्या हितासाठी आवश्यक अशी इतर कार्ये करणे.

बिगर कृषी सहकारी पतसंस्थांपुढील समस्या

(Problems faced by NACC)

१. भांडवलाची कमतरता :

बिगर कृषी सहकारी पतसंस्थांचे कार्यक्षेत्र मर्यादित असते. परिणामतः त्यांच्या सभासदांची संख्यासुद्धा मर्यादित असते. सदर संस्थांची निर्मिती ही प्रामुख्याने मध्यम व अल्प उत्पन्न गटातील सभासदांद्वारे केली जात असल्याने संस्था चालविण्यासाठी गोळा करण्यात आलेल्या भांडवलाचे प्रमाण हे बऱ्याचदा पुरेसे असत नाही. परिणामतः अल्प भांडवलामुळे अशा संस्थांना मर्यादित प्रमाणातच विस्ताराच्या व विकासाच्या संधी उपलब्ध होतात. यामुळेच अपुरे भांडवल अथवा भांडवलाची कमतरता ही सदर प्रकारातील संस्थांपुढील एक प्रमुख समस्या आहे.

२. राजकीय हस्तक्षेप व घराणेशाहीचा प्रादुर्भाव :

मागील काही काळात. सहकारी पतसंस्थांच्या पतनास कारणीभूत ठरलेला मुख्य घटक म्हणजे अशा संस्थामध्ये मोठ्या प्रमाणात होणारा राजकीय हस्तक्षेप व त्यातून निर्माण होणारी गटबाजी तसेच संस्था संचालक मंडळाद्वारे संस्थेचे नियमन लोकशाही मार्गाने करण्यास केली जाणारी टाळाटाळ हे आहेत. सदर संस्थांचा उपयोग राजकीय तसेच वैयक्तिक आकांक्षा पूर्ण करण्याचा एक माध्यम म्हणून करण्याची बळावलेली प्रवृत्ती व त्यातून होणारा संस्थेच्या संसाधनांचा अपव्यय यामुळे जनतेचा सदर संस्थांवरील विश्वास घटत चालला आहे.

३. मनुष्यबळ अथवा कर्मचारीविषयक समस्या :

बिगर कृषी सहकारीपतसंस्थेत केली जाणारी कर्मचारी भरती ही बऱ्याचदा वैयक्तिक व राजकीय वशिलेबाजीतून केली जाते. अनेक संस्थांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात कर्मचारी नेमले जातात. यातून संस्थेच्या नफाक्षमतावरील भार वाढत जातो. बऱ्याचदा नेमण्यात आलेला कर्मचारी वर्ग हा अप्रशिक्षित तसेच अकार्यक्षम असतो व अशा कर्मचाऱ्यांना सदर क्षेत्राला लागू असणारे कायदे, नियम, उपविधी, सहकाराची तत्वे तसेच हिशेब नोंदणीविषयक पुरेसे ज्ञान नसते. या सर्वांचा परिणाम संस्थेच्या कामातील गुणवत्तेवर होतो व संस्थेचे कामकाज बिनचूक व नियमित होण्यास अडथळे निर्माण होतात.

४. संगणकीकरण व तंत्रज्ञान वापराचा अभाव :

सध्याच्या काळात कोणत्याही क्षेत्रात बिनचूक व वेगवान काम करण्यासाठी संगणक व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अपरिहार्य बनले आहे. बिगर कृषी सहकारी संस्थांमध्येसुद्धा संगणक व तंत्रज्ञानाचा वापर वाढतो आहे ही समाधानाची गोष्ट आहे. मात्र त्याच वेळी अशा तंत्रज्ञान वापराचे पुरेसे प्रशिक्षण संस्थांद्वारे कर्मचाऱ्यांना दिलेले आढळत नाही व कर्मचारीसुद्धा अशा तंत्राच्या वापराबाबत उदासीन राहतात. बऱ्याच संस्था प्रकारात लेखापरीक्षणाचे वेळी संस्थेने हिशेब हे लिखित नोंदी व संगणकीय नोंदी अशा दोन्ही प्रकारात ठेवल्याचे आढळून आले आहे ज्याची आवश्यकता नाही.

५. व्याजदरांचे उच्च प्रमाण :

बैंकिंग क्षेत्रात निर्मिती स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सभासदांकडून अधिकाधिक ठेवी गोळा करण्याच्या दृष्टिकोणातून बिगर कृषी सहकारी पतसंस्था ग्राहकांना आकर्षित करेल अशा व्याजदरावर ठेवी स्वीकारताना आढळतात. सदर ठेवींवरील व्याजदर हे बँकिंग क्षेत्रातील संस्थेद्वारे दिल्या जाणाऱ्या व्याजदरापेक्षा जास्त असतात. दुसऱ्या बाजूला सदर संस्थांनी केलेला कर्जपुरवठा मात्र व्यवसाय वृद्धीच्या दृष्टिकोणातून स्पर्धात्मक व्याजदरावर केला जातो. याचा परिणाम सदर संस्थांचा गाळा कमी होण्यात होत असतो. सदर कारणामुळे संस्थेची नफाक्षमता घटून संस्था तोट्यात जाण्याची शक्यता वाढते.

६. अनुत्पादक मालमत्तेच्या वा बुडीत कर्जाच्या प्रमाणातील वाढ :

अनुत्पादक मालमत्ता प्रमाणात होणारी वाढ व वेळेत वसूल न होणारी कर्जे ही आजच्या एकूणच बँकिंग व पतपुरवठा संस्थांपुढील एक प्रमुख समस्या आहे. वेळच्या बळी घेतलेल्या कर्जाची फेड न करण्याची सभासदांची मानसिकता, सभासदांच्या आर्थिक कुवतीकडे न पाहता करण्यात आलेले कर्जवाटप, संस्था संचालक व त्यांच्या नातेवाइकांना बनावट नाव व कागदपत्रांच्या आधारे केलेले कर्जवाटप तसेच बिगरकृषी सहकारी पतसंस्थाकडील अपुरी व अक्षम कर्ज वसुली यंत्रणा या सर्वांमुळे या पतसंस्थांच्या अनुत्पादक मालमत्तेच्या प्रमाणात वाढ होते आहे.

७. योग्य नेतृत्व आणि व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव :

सहकार क्षेत्र तसेच व्यावसायिक व्यवस्थापन या विषयात रूढार्थाने कोणतेही शिक्षण न झालेल्या व्यक्ती आज मोठ्या प्रमाणात सदर संस्थांचे नेतृत्व करताना आढळतात. संस्थांच्या व्यवसायाचे नियोजन, भविष्यकालीन बदलांचा आढावा, संस्था कारभारातील आर्थिक शिस्तीची अंमलबजावणी, सदर संस्थांना लागू असणाऱ्या कायदे व नियमांचे पालन अशा गोष्टींचा संस्थेच्या कामकाजात अभाव आढळतो. संस्थेचे संचालक मंडळसुद्धा बऱ्याचदा नाममात्र असते व केवळ मोजकेच संचालक संस्थेचा कारभार हाकत असतात. ज्यांच्याकडून एकतर्फी निर्णय घेतला जाण्याची शक्यता जास्त असते.

८. लेखापरीक्षणविषयक समस्या :

बिगर कृषी सहकारी पतसंस्थांमध्ये बऱ्याचदा अंतर्गत हिशोब तपासणीस नियुक्त केलेला नसतो. यासोबतच संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण करत असताना सहकार खात्याने सदर संस्थांना त्यांच्या वैधानिक लेखापरीक्षक नेमणुकीची परवानगी दिल्यामुळे संस्था संचालकांच्या मर्जीतील लेखापरीक्षकाची नेमणूक संस्थांच्या वैधानिक लेखापरीक्षण कार्यासाठी केली जाते. वैयक्तिक हितसंबंधातून यामुळे बऱ्याचदा लेखापरीक्षकाकडून सदर संस्थांतील अफरातफर व घोटाळयांकडे दुर्लक्ष केले जाते. संस्थांना वैधानिक लेखापरीक्षणानंतर सातत्यपूर्ण रीतीने मिळणारा 'अ' अथवा 'ब' वर्ग आणि त्याच वेळी असणारी संस्थेची प्रत्यक्ष आर्थिक व वित्तीय परिस्थिती यामध्ये फार अंतर असते. सदर समस्येमुळेच मागील काही दशकांत बिगर कृषी सहकारी पतसंस्थात मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळे व अफरातफरीचे प्रकार घडल्याचे दिसून आले आहे.

९. सरकारी स्तरावरील अनास्था :

बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना अथवा इतर कोणत्याही प्रकारची मदत मिळत नाही. दुसऱ्या बाजूला केंद्र शासन व सरकारकडून राज्य शासन यांच्या धोरणात असणाऱ्या विसंगतीचा फटकासुद्धा सदर संस्थाना भांडवल बसतो. शासकीय यंत्रणेत सहकार खात्याद्वारेसुद्धा सदर संस्थांसाठी कायदे व नियमांचीनिर्मिती केली जाते मात्र त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले जाते. बिगर कृषी सहकारी पतसंस्थांची अल्पकाळातील व्यवसायवाढीची कोटीची उड्डाणे पाहता आज सदर संस्थांचा वापर मोठ्या प्रमाणात काळा पैसा लपविण्यासाठी होत असल्याचे जाणवते. मात्र याबाबत सरकार अथवा आयकर विभाग उदासीन असल्याचे दिसून येते.

१०. आर्थिक बेशिस्तपणा :

कर्मचारी व संस्था सभासदांना सणवार अथवा संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात येणाऱ्या वस्तुरूपातील महागड्या भेटी, संस्था संचालक मंडळाच्या काढण्यात आलेल्या अनावश्यक अभ्यास सहली, संस्थेची कार्यालय दुरुस्ती व सजावट यासाठी करण्यात आलेला खर्च, संस्थेच्या विविध सभांमध्ये सत्कार साहित्य व इतर गोष्टींवर केला जाणारा खर्च सर्वांवर संस्था संचालक अथवा व्यवस्थापनाद्वारे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवले जात नाही व याउलट, अशा गोष्टींना प्रोत्साहन दिले जाते. सदर प्रकारात संस्थेकडील निधी व रोख शिलकीचा वारेमाप वापर केला जातो.

११. इतर समस्या :

(अ) पुरेशा खेळत्या भांडवलाचा अभाव.

(ब) बँकिंग क्षेत्रातील तीव्रतम स्पर्धा.

(क) सभासदांकडून संस्थेसोबत व्यवहार करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या प्राधान्याचा अभाव.

(ड) संस्था नफा विभागणीमधून विशिष्ट निधीत गुंतवणूक करण्याची सक्ती.

ग्राहक सहकारी संस्था

'ग्राहक वर्गाने स्वेच्छेने एकत्र येऊन जीवनावश्यक आणि अन्य वस्तूंचा पुरवठा वाजवी किमतीत, मागणीनुसार निर्भेळ स्वरूपात, योग्य वजनमापात करावा या हेतूने स्थापन झालेल्या संस्थांना ग्राहक सहकारी संस्था म्हणतात.' खाजगी व्यापारी व पुरवठादाराकडून ग्राहक वर्गाची आणि समाजाची होणारी फसवणूक आणि पिळवणूक थांबवावी आणि समाजाने किंवा ग्राहक वर्गाने स्वतःच्या गरजा कमी खर्चात भागवाव्यात यासाठी ग्राहक सहकारी संस्था स्थापन करतात. एक प्रकारे ग्राहकांना कमी किमतीत मालाचा पुरवठा करून खर्चात बचत करणे व त्यातून त्यांचे जीवनमान सुधारण्यास या संस्था मदत करतात.

ग्राहक सहकारी संस्थांचे प्रकार

(Types of Consumer Co-operatives)

(अ) प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था (Primary Consumer Societies) : प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था या देशाच्या नागरी व ग्रामीण भागात ग्राहक वर्गाकिडून उघडल्या जातात. ही भांडारे मध्यवर्ती घाऊक भांडाराचे सभासद असतात. सामान्यपणे ग्राहकवर्गाच्या नित्याच्या गरजांची पूर्तता ही भांडारे करतात. प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांचे भारतात आढळणारे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत..

१. कर्मचारी/कामगारांच्या ग्राहक सहकारी संस्था

(Employees/worker's Consumer Co-operative Societies) :

एकाच संस्था अथवा संघटनेत कार्यरत असणाऱ्या कर्मचारी व कामगारांद्वारे त्यांच्या उपभोग अथवा वापरविषयक वस्तूंच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सदर संस्था स्थापन केल्या जातात. सदस्यांना योग्य किमतीत वस्तूंचा पुरवठा करणे हा त्यांचा प्रमुख उद्देश असतो. प्रथमतः केंद्रीय मजूर आणि रोजगार मंत्रालयाने १९६२ मध्ये ३०० पेक्षा अधिक कामगार असणाऱ्या कामगारांसाठी अशा संस्था अथवा भांडारे सुरू करण्याची योजना तयार केली होती. भारतात शासकीय कर्मचारी, रेल्वे बोर्ड, खाण कामगार, बंदरांवर काम करणारे कामगार तसेच इतर संस्था प्रकारात कार्यरत कर्मचारी व कामगार वर्ग यांच्यासाठी अशा संस्था कार्यरत असल्याचे दिसून येते.

२. विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्राहक भांडारे

(Co-operative Stores at School, Colleges and University) :

देशातील विश्वविद्यालये व महाविद्यालयांतील विद्यार्थी वर्गाच्या शैक्षणिक साहित्यविषयक गरजा पुन्य करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने अशा भांडारांच्या विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी विश्वविद्यालये व महाविद्यालयांना विशेष अनुदान देऊ केले आहे.

३. सुपर बझार व विभागीय भांडारे

(Super Market and Departmental Stores) :

विभागीय भांडारांची सुरुवात देशात १९६६ मध्ये दिल्ली येथे एका मोठ्या विभागीय भांडार किंवा सुपर बझारच्या स्थापनेद्वारे झाली. नंतरच्या काळात अशी भांडारे देशातील मोठ्या शहरांतून सुरू करण्यात आली. एकाच छताखाली सर्व प्रकारच्या नित्योपयोगी वस्तू मिळण्याची सोय या भांडारांमुळे होते.

४. ग्रामीण जनतेसाठी ग्राहक भांडारे

(Co-operative Store for Rural People) :

ग्रामीण जनतेच्या सोईसाठी ग्राहक भांडारे अत्यावश्यक ठरतात, परंतु तेथे अशी भांडारे स्थापन करण्यात अडचणी येतात. यासाठी देशातील प्राथमिकसहकारी पतपुरवठा संस्था तसेच प्राथमिक सहकारी विपणन तसेच सहकारी सेवा संस्था यांच्यावर ग्रामीण भागात आवश्यक ग्राहकोपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी सहकारी ग्राहक भांडारे सुरू करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

(ब) जिल्हास्तरीय / मध्यवर्ती घाऊक भांडारे

(District Level Wholesale Consumers Stores)

१९६२ नंतर केंद्र सरकारच्या धोरणानुसार ५०,००० पेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या शहरांतून मध्यवर्ती घाऊक भांडारे स्थापन करण्यात आली. ही भांडारे प्राथमिक सहकारी संस्थांना मालाचा पुरवठा करणे, ग्राहक चळवळीवर चर्चासत्रे आयोजित करणे, प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांचे आदेश नोंदवून त्यानुसार मालाचा पुरवठा करणे, आवश्यकतेनुसार उत्पादन व प्रक्रिया केंद्रांची निर्मिती करणे तसेच आपल्या कार्यकक्षेत किरकोळ व्यापारी शाखा उघडणे इत्यादी कार्ये करतात.

(क) राज्य ग्राहक सहकारी संघ

(State Co-operative Consumer's Federation) :

राज्य ग्राहक सहकारी संघ १९६५-६६ मध्ये निर्माण करण्यात आला. घाऊक विक्री भांडारे व प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांच्या धोरणात, व्यवहारात व कार्यात सुसूत्रता आणणे हे या संघाच्या निर्मितीतील उद्देश होते. राष्ट्रीय संघ व विभागीय भांडारे यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य राज्य संघास करावे लागते.

(ड) राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ

(National Co-operative Consumer's Federation) :

भारतातील सर्व राज्यांतील राज्य ग्राहक सहकारी संघाची राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघ ही शिखर संस्था आहे. संस्थेचे प्रमुख कार्यालय दिल्ली येथे असून मुंबई, चेन्नई, कोलकाता, गुवाहाटी या ठिकाणी प्रादेशिक कार्यालये आहेत. ही संस्था प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांना राज्य संघामार्फत मालाचा पुरवठा करणे, वस्तूंची आयात-निर्यात करणे, ग्राहकोपयोगी वस्तूंवर प्रक्रिया करणे, सहकारी चळवळीचा प्रसार करणे तसेच ग्राहक सहकारी संस्थांना मदत व मार्गदर्शन करण्याचे कार्य करते.

ग्राहक सहकारी संस्थांची भूमिका

(Role of Consumer Co-operatives)

१. वस्तू व सेवांच्या गरजेनुसार पुरवठा:

ग्राहक सहकारी संस्था या ग्राहक वर्गाच्या वस्तू आणि सेवांविषयक गरजा मागणीनुसार पूर्ण करण्यासाठी अस्तित्वात येतात. त्यात प्रत्यक्ष उत्पादक किंवा कारखानदाराशी संबंध प्रस्थापित करून खरेदी केली जाते. म्हणून ग्राहक वर्गास मागणीनुसार मालाचा पुरवठा करता येतो. त्यामुळे व्यापारी वर्गाद्वारे केला जाणारा काळाबाजार व टंचाई यास काही प्रमाणात पायबंद बसतो.

२. व्यापारी साखळीचे उच्चाटन

वितरण व्यवस्थेत उत्पादकापासून ग्राहक वर्गापर्यंत व्यापारी वर्गाची लांब साखळी आढळते. त्या सर्वांचा नफा व खर्च किमतीत धरून शेवटी ग्राहकांच्या पदरात ती वस्तू कितीतरी अधिक किमतीत पडते. ग्राहक सहकारी संस्था वस्तूंची खरेदी उत्पादकांकडून करतात. त्यामुळे मध्यस्थांची साखळी टाळली जाते. तिचे पूर्णपणे उच्चाटन करता येत नसले तरी काही प्रमाणात उच्चाटन केल्याने वस्तूंच्या किमती कमी ठेवणे संस्थेस शक्य होते.

३. अनिष्ट व्यापारी प्रथांचे उच्चाटन

व्यापार क्षेत्रात आपणास काळाबाजार, टंचाई, भेसळ, वस्तूच्या परिमाण व दर्जाबाबत होणारी फसवणूक, योग्य वजनमापे न बापरणे, स्थानिक कर भरमसाट लावणे इत्यादी अनिष्ट प्रथांचा ग्राहक वर्ग शिकार बनतो. ग्राहक सहकारी संस्था या सर्व अनिष्ट प्रथांना आपल्या कार्यात स्थान देत नाहीत. त्यामुळे ग्राहक वर्ग या संस्थांकडे आकर्षिला जातो.

४. इष्ट व्यापारी प्रथांची स्थापना

ग्राहक सहकारी संस्था ग्राहक वर्गास योग्य वजनमापे वापरून निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा वाजवी किमतीत करतात. तसेच, वस्तूंचा काळाबाजार, टंचाई यांना थारा देत नाहीत. वस्तूंचा पुरवठा ग्राहक वर्गाच्या मागणीनुसार करतात. त्यामुळे ग्राहक वर्गाच्या दृष्टीतून या संस्थांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

५. ग्राहक वर्गास प्राप्तीच्या प्रमाणात गरजांची पूर्तता करण्याचे शिक्षण :

ग्राहक वर्गास त्यांच्या प्राप्तीच्या प्रमाणात गरजांची पूर्तता करावी लागते. ग्राहक सहकारी संस्थांमुळे ग्राहकास त्यांच्या प्राप्तीच्या प्रमाणात गरजा कशा भागवायच्या याचे शिक्षण मिळते. तसेच ग्राहक वर्गास बचत व काटकसरीची सवय या संस्था लावतात. त्यामुळे ग्राहक बर्गाचे जीवनमान उंचावण्यास मदत होते..

६. काळाची गरज

भारताने आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला आहे. त्यामुळे सार्वजनिक वस्तू वितरण कार्यास विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. देशातील नागरी व ग्रामीण जनतेच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होण्यासाठी आवश्यक वस्तूंचे वितरण करण्याच्या कार्यात सरकारला ग्राहक सहकारी संस्था मोलाची मदत करू शकतात व करत आहेत. त्यामुळे या संस्थांना दिवसेंदिवस अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. या संस्थांकडे वस्तू वितरणाचे कार्य सोपविल्यामुळे ग्राहक वर्गाची होणारी पिळवणूक व त्यास होणारा त्रास थांबण्यास मदत होते.

समस्या व उपाययोजना

(Problems and Remedies)

१. आर्थिक स्थितीत सुधारणा ग्राहक सहकारी संस्थेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी अशा संस्थांना सरकारने आर्थिक मदत केली पाहिजे तसेच अनुदानात वाढ केली पाहिजे. दुर्बल घटकांसाठी सुरू करण्यात आलेल्या ग्राहक सहकारी संस्थांना सरकारने सढळ हाताने मदत करणे आवश्यक आहे.

२. कर्जास सरकारची हमी ग्राहक सहकारी संस्थांद्वारे उभारल्या जाणाऱ्या कर्जाच्या परतीची हमी सरकारने द्यावी. त्यामुळे अशा संस्थांना कर्जे उभारता येतील. त्यामुळे त्यांच्या व्यवहारात वाढ होणे शक्य होईल.

३. वस्तूंत विविधता : ग्राहक सहकारी संस्थांद्वारे मर्यादित वस्तूंचा पुरवठा केला जातो. त्यामुळे त्यांच्याकडे येणारा ग्राहक वर्ग मर्यादित आहे. त्यांनी विक्रीस ठेवल्या जाणाऱ्या वस्तूंत विविधता ठेवावी. त्यामुळे ग्राहक वर्ग वाढून व्यवहाराचे प्रमाणही वाढेल.

४. नियमित हिशेब तपासणी : या संस्थांची नियमितपणे हिशेब तपासणी करण्यावर सहकारी खात्याने लक्ष द्यावे. नियमित हिशेब तपासणीमुळे या संस्थांना सरकारी अनुदान नियमितपणे मिळू शकेल. त्यातून त्यांची आर्थिक स्थिती सावरण्यास मदत होईल.

५. सरकारी प्रोत्साहन : या संस्थांसाठी सरकारी प्रोत्साहन लाभणे आवश्यक आहे, जीवनावश्यक आणि अन्य वस्तूंचा पुरवठा प्राधान्याने याच संस्थांमार्फत करण्याचे प्रयत्न झाल्यास या संस्थांना मदत होईल, तसेच त्यांच्या व्यवहाराच्या प्रमाणात वाढ होईल.

६. कर्मचारी वर्गास प्रशिक्षण : ग्राहक सहकारी संस्थांनी आपल्या कर्मचारी वर्गास व्यावहारिक प्रशिक्षण द्यावे. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा होईल. ७. कार्यक्षम कर्मचारी वर्ग : संस्थेने शिक्षित आणि कार्यक्षम कर्मचारी वर्गनेमण्याकडे लक्ष द्यावे. त्यामुळे कार्यात सुधारणा होऊन व्यवहाराच्या प्रमाणात वाढ होण्यास मदत होईल.

८. खर्चावर नियंत्रण: ग्राहक सहकारी संस्थांच्या नित्याच्या खर्चाचे प्रमाण अधिक आहे. त्यांनी खर्च नियंत्रित करण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे ग्राहकांना चांगली सेवा देणे शक्य होईल.

९. सभासदांच्या दृष्टिकोणात बदल : सभासदांनी संस्थेबाबत उदासीनतेचा दृष्टिकोण सोडून देऊन संस्थेच्या कार्यात लक्ष द्यावे. त्यामुळे व्यवहारात सुधारणा होण्यास आणि संस्थेची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

१०. किमतीबाबत अभ्यासपूर्ण धोरण: संस्थेने वस्तूंच्या किमतीबाबतचे धोरण अभ्यासपूर्वक ठरवावे. खाजगी व्यापाऱ्यांप्रमाणे किमती लावणे टाळावे. सभासदांना ग्राहक सहकारी संस्थांतून वाजवी किमतीत वस्तू मिळतात याची खात्री पटली पाहिजे तरच ग्राहक आणि व्यवहार दोहोंत वाढ होऊ शकेल.

सहकारी साखर कारखाने

भारतातील वैदिक साहित्य, 'चरकसंहिता', 'सुश्रुत संहिता', 'प्रीतिमोक्ष', पातंजलीचे 'महाभाष्य', पाणिनीचे 'व्याकरण', मनूचे 'मानवधर्मशास्त्र', मॅगेस्थेनिस आणि चाणक्याच्या नोंदी आणि कालिदासाने लिहिलेल्या 'मालविका अग्निमित्रा' इत्यादी ग्रंथांतून उसाचा आणि साखरेचा उल्लेख सापडतो. चिनी प्रवासी ताय संग (६२७ ते ६५० ए. डी.) तसेच फा. हेन (३९९ ए. डी.) आणि त्यानंतर दोनशे वर्षांनी ह्यू-एन-संग या चिनी प्रवाशाने भारतात साखरेचा व्यापार चालत असल्याचा उल्लेख आपल्या नोंदीत केला आहे. मार्को पोलो आणि अल्लाउद्दीन खिलजी यांच्या ऐतिहासिक नोंदीत साखरेच्या बाजारपेठेचे उल्लेख सापडतात. भारतात ईस्ट इंडिया कंपनीची डिसेंबर, १६०० मध्ये स्थापना होईपर्यंत साखरेचे उत्पादन हाताने चालवायच्या साधनाने केले जात होते. ईस्ट इंडिया कंपनीची सुरुवात याल्यानं भारतात साखर कारखानदारीची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि नंतरच्या काळात कारखानदारीचा विकास झाला.

सहकारी साखर कारखान्यांची भूमिका

(Role of Sugar Cooperatives)

सहकारी साखर कारखाने हे ग्रामीण भागात कार्य करीत असून त्यांना ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. देशाच्या आणि राज्याच्या ग्रामीण भागातील विकासाची केंद्रे म्हणून सहकारी साखर कारखान्यांकडेपाहिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाकडे सहकारी साखर कारखान्यांना विशेष लक्ष देऊन आपल्या नफ्याचा काही भाग ग्रामीण विकास कार्यासाठी वापरावा लागतो. सहकारी साखर कारखाने ग्रामीण विकासाच्या कार्यात कोणती भूमिका पार पाडतात याचा सखोल विचार पुढील मुद्द्यांच्या आधारे करता येईल.

(अ) आर्थिक विकासातील सहभाग

१. ऊस लागवड आणि उत्पादनवाढ

सर्वच साखर कारखान्यांनी आपल्या कारखान्यात शेती विभाग उघडला असून त्यामार्फत ऊस लागवड करण्यापूर्वीपासून ते हंगामात उसाची वाहतूक कारखान्याकडे करण्यापर्यंत विविध बाबींकडे लक्ष दिले जाते. उसाची लागवड शास्त्रीय पद्धतीने करण्यासाठी माती परीक्षण करणे, सुधारित बी-बियाणांचा पुरवठा व वापर, खतांचा योग्य वापर, जंतुनाशकांचा योग्य वेळी वापर करणे, उसाची लागवड करण्याची शास्त्रीय पद्धती अवलंबिणे, पाणीपुरवठा नियमितपणे करणे, शेतकऱ्यांना पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रोत्साहन देणे, ऊस तोडणीचे वेळापत्रक ठरविणे आणि त्यानुसार ऊस तोडणी करून कारखान्यास ऊस पाठविणे या सर्व बाबतीत साखर कारखाने शेतकऱ्यास मदत करतात.

२. औद्योगिक आणि व्यावसायिक उपक्रमांना उत्तेजन

ग्रामीण भागात साखर कारखान्यांच्या स्थापनेमुळे त्या भागात औद्योगिक आणि व्यावसायिक उपक्रम स्थापन होण्यास उत्तेजन मिळाले आहे. विशेषतः कृषी व्यवसायासाठी उपयुक्त हत्याराची निर्मिती, स्वयंचलित वाहन सेवा केंद्रे, हॉटेल्स, ट्रॅक्टर रिपेअरी, स्पेअरपार्ट यंत्रे व विक्री, डिस्टिलरी, पेपर मिल, रसायन निर्मिती, पक्षीपालन, बेकरीज, वराह पालन, डेअरीज, पशुखाद्य प्रकल्प, खते उत्पादन, किराणा माल दुकाने, विभागीय वस्तू भांडारे, जनता स्टोअर्स इत्यादी व्यवसाय साखर कारखान्यांच्या जवळपास सुरू होतात. सहकारी साखर कारखाने ग्रामीण जनतेला वरील प्रकारचे उपक्रम सुरू करण्यास प्रोत्साहन देतात.

३. ऊस संशोधन आणि विकासात सहभाग :

नियमितपणे पुरेशा प्रमाणात उसाचा पुरवठा व्हावा यासाठी साखर कारखान्यांना प्रयत्न करावे लागतात. कारण त्यावरच त्यांचे अस्तित्व अवलंबून असते. यासाठी सर्वच सहकारी साखर कारखान्यांनी ऊस संशोधन केंद्राची स्थापना केली असून त्यामार्फत पायलट स्कीम तयार करून ऊस बियाणे तयार करणे, खताचा वापर, पाणी व्यवस्थापन इत्यादींबाबत प्रयोग केले जातात. संशोधनातून प्राप्त होणाऱ्या सुधारित बियाणांचा पुरवठा शेतकरी वर्गास केला जातो. त्यामुळे ऊस उत्पादनवाढीस मदत होते.

४. ग्रामीण रस्तेबांधणी

साखर कारखाने ग्रामीण भागात असल्याने ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे तयार करणे आणि त्यातून शेतापासून मुख्य रस्त्याला जोडणारे रस्ते बांधणे आणि त्यांची दरवर्षी दुरुस्ती करणे अत्यावश्यक ठरते. त्यामुळे शेतापासून ते कारखान्यापर्यंत उसाची वाहतूक सहज करता येते. तसेच शेतीसाठी यंत्रे व अवजारे शेतापर्यंत नेणे शक्य होते. साखर कारखान्यांना रस्तेबांधणीसाठी शासन काही अनुदान देते आणि बाकी खर्च साखर कारखान्यांना करावा लागतो. रस्तेबांधणी कार्यामुळे वाहतूक कार्यात बरीच सुधारणा झाली असून रोजगाराचे प्रमाण वाढले आहे.

५. काटकसर आणि बचतीच्या सवयी जोपासणे :

सहकारी साखर कारखान्यांमुळे ग्रामीण भागांतील ऊस उत्पादक आणि बिगर ऊस उत्पादक यांच्या प्राप्तीच्या प्रमाणात वाढ होण्यास मदत झाली. ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखा, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, ग्रामीण विकास बँका आणि पतसंस्था ग्रामीण जनतेला काटकसर आणि बचतीच्या सवयी लावण्यात पुरेशा यशस्वी झाल्या आहेत. सहकारी साखर कारखाने ऊस उत्पादकाकडून परतीच्या आणि बिनपरतीच्या ठेवी आणि ऐच्छिक ठेवी गोळा करत आहेत. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात गोळा होणाऱ्या बचती विकासकामासाठी उपलब्ध होत आहेत.

६. औद्योगिक विकास :

सहकारी साखर कारखान्यांनी साखर उत्पादनावर लक्ष केंद्रित न करता चिपाडापासून कागदनिर्मिती, मोलॅसिसपासून स्पिरिट, ॲसिड आणि खतनिर्मितीचे उद्योग सुरू केले आहेत. तसेच चिपाडापासून प्लायवूड निर्मितीचे उद्योगकाही कारखान्यांनी सुरू केले आहेत. कारखान्यांनी स्वतंत्रपणे निधी उभारून आयुर्वेदिक औषधांच्या बागा तयार करणे, हॉस्पिटल उभारणी इत्यादींमुळे कारखान्यांच्या भागाचा विकास होण्यास मदत झाली आहे. त्यातून रोजगारात वाढ झाली आहे.

७. परकीय चलनाची बचत:

भारतात सध्या साखर कारखान्यांना उसापासून इथेनॉल निर्मिती करावी यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. सदर इथेनॉलचा उपयोग वाहनांसाठी वापरावयाच्या इंधनात मिश्रणासाठी होणार आहे. या गोष्टींचा फायदा भारताला इंधन आयातीवरील खर्चात बचतीसाठी होणार आहे.

८. विद्युतनिर्मिती: कारखानदारीची निर्मिती करीत असताना उद्योगांना पाणी आणि वीज अत्यावश्यक असते. साखर कारखान्यांनी आधुनिक काळात सहवीज प्रकल्प उभारणी करण्यात पुढाकार घेतला आहे. साखर कारखान्यांच्या सीझनच्या काळात असे प्रकल्प सुरू राहिल्याने कारखान्याची विजेची गरज भागते. तसेच कारखान्याजवळील गावांनाही वीज उपलब्ध होते.

९. रोजगारात वाढ साखर कारखाने आणि त्यांच्या इतर प्रकल्पांमुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारीत मोठी वाढ होते. कारखान्याजवळ निघणाऱ्या अन्य उद्योग सेवा संस्थांमुळे आणि बाजारपेठांमुळे प्रचंड प्रमाणात रोजगारात वाढ होते.

(ब) सामाजिक विकासात सहभाग

१. शैक्षणिक विकास:

बहुतेक साखर कारखान्यांनी आपल्याकडील उपलब्ध आधिक्याचा काही भाग शैक्षणिक कार्यासाठी उपलब्ध करून त्यातून प्राथमिक शिक्षणापासून पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत. तसेच काही साखर कारखान्यांनी तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था सुरू केल्या आहेत.

२. वैद्यकीय सुविधा

आपल्या कार्यक्षेत्रात सहकारी साखर कारखान्यांनी प्राथमिक स्वास्थ्य केंद्रे, दवाखाने, प्रसूतिगृहे आणि कुटुंब नियोजन केंद्रे चालविली असून ग्रामीण जनतेला आवश्यक सुविधा अल्प खर्चात पुरवीत आहेत. काही साखर कारखान्यांनी स्वतः मोठी इस्पितळे काढली असून येथे एक्स-रे, ब्लड बँक, पॅथॉलॉजिकल सोई, स्कॅनिंग सोई आणि अन्य आधुनिक सोई उपलब्ध केल्या आहेत. साखर कारखान्यांच्या ठिकाणी ठरावीक काळाने कुटुंब नियोजन, नेत्र चिकित्सा, दंत चिकित्सा इत्यादींसाठी शिबिरे भरविली जातात.

३. गृहनिर्माण साखर कारखान्यांत काम करणाऱ्या कामगार आणि अन्य सेवकांना कारखान्यांद्वारे निवासाच्या सोई पुरविल्या जातात, अशा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागांतील मागासवर्गीय लोकांना मोफत घरे पुरविली आहेत.

४. क्रीडाविषयक सुविधा : काही साखर कारखान्यांनी जिमखानाविषयक सुविधा स्थापन केल्या असून कबड्डी, पोहणे, कुस्ती इत्यादी सामने भरविले जातात. कारखान्यांद्वारे कार्यक्षेत्रातील गावातील तालीम संघांना आर्थिक मदत दिली जाते. तसेच राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर खेळांत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आर्थिक मदत व प्रोत्साहन दिले जाते.

५. वीज आणि पाणीपुरवठा :

शेतीला नियमित पाणीपुरवठा करता यावा यासाठी कारखाने शेतकऱ्यांना लघु पाणीपुरवठा योजना चालू करण्यास आर्थिक मदत देतात. कारखान्यांनी खडक खोदणे तसेच बोअर मारण्याची यंत्रसामग्री खरेदी केली असून भागांतील शेतकऱ्यांना अल्प खर्चात त्याबाबतच्या सोई दिल्या जातात. साखर कारखाने पाणी टंचाईच्या काळात कार्यक्षेत्रातील गावांना टँकरने पाणीपुरवठा करतात. काही साखर कारखाने हंगामात विजेची निर्मिती करतात. कार्यक्षेत्रातील गावांतून पंपावर तसेच घरात वापरण्यासाठी विजेच्या सोई केल्या असून त्यामुळे रेडिओ आणि दूरचित्रवाणीची सोय ग्रामीण भागांत पोहोचण्यास मदत झाली आहे.

६. महिला कल्याण : आजपर्यंत दुर्लक्षित असलेल्या महिला कल्याणाकडे साखर कारखाने लक्ष देत असून महिला कल्याण योजनेअंतर्गत आपल्या कार्यक्षेत्रातील महिलांना मदत करीत आहेत. तसेच कारखाना कार्यक्षेत्राजवळील गरजू महिलांना मसाले, पापड, होजिअरी माल तयार करणे इत्यादी व्यवसाय चालवून अर्धवेळ नोकरी उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे महिलांना ठरावीक उत्पन्न नियमित मिळण्यास मदत झाली आहे.

७. कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग सहकारी साखर कारखान्यांनी कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करून घेण्याची कल्पना फक्त तत्त्वतः मान्य केलेली नसून कामगारांनी निवडलेल्या प्रतिनिधींना संचालक मंडळात स्थान दिले आहे.

सहकारी साखर कारखान्यांचा विकास

(Progress of Sugar Co-operatives)

सहकारी क्षेत्रातील साखर कारखान्यांच्या उभारणीचा विचार करता १९१२ मध्ये आर. एन. हिरेमठ आणि जी. एन. सहस्त्रबुद्धे या साखर तज्ज्ञांनी साखर कारखाना सहकारी क्षेत्रात काढण्याची योजना मांडली. परंतु साखर कारखाना सहकारी क्षेत्रात काढण्याची योजना मूर्त स्वरूपात साकारण्याचे काम सहकार तज्ज्ञ लल्लुभाई समळदास यांनी जी. एन. एन. सहस्त्रबुद्धे यांच्या मदतीने १९९८ मध्ये पूर्ण केले आणि तो 'दी निरा व्हॅली सहकारी साखर कारखाना' नावाने पहिला सहकारी साखर कारखाना पुणे जिल्ह्यातील बारामती येथे अस्तित्वात आला. त्यामुळे सहकार क्षेत्रातील साखर कारखानदारीच्या युगास सुरुवात झाली. परंतु गुळाचे भाव वाढत गेल्याने आणि उसाच्या कमतरतेमुळे हा कारखाना सन १९२४ मध्ये बंद पडला. याच काळात खासगी क्षेत्रात १५ साखर कारखाने नफ्यात कार्य करीत होते.

महाराष्ट्रातील खाजगी क्षेत्रातील साखर कारखानदारीचा विचार करता महाराष्ट्रात १९१९ मध्ये पहिला साखर कारखाना अहमदनगर जिल्ह्यातील हरेगाव येथे एका ब्रिटिश कंपनीने सुरू केला. १९३० मध्ये पुण्यातील वालचंदनगर येथे वालचंद उद्योग समूहाने साखर कारखाना सुरू केला. भारतातील ब्रिटिश सरकारने १९३२ मध्ये साखर कारखानदारीस करविषयक संरक्षण दिल्यानंतर महाराष्ट्रात साखर कारखाना उभारणीस प्रोत्साहन मिळून १९३३ ते १९३४ या काळात फलटण, कोल्हापूर आणि रावळगाव येथे तीन आणि १९३३ मध्ये बेलवंडी, माळीनगर आणि टिळकनगर येथे तीन असे सहा साखर कारखाने निघाले. कालांतराने १९३९ मध्ये साकरवाडी आणि शिरपूर येथे, १९४९ मध्ये चांगदेवनगर आणि लक्ष्मीवाडी येथे साखर कारखाने निघाले. अशा प्रकारे १९४१ अखेर महाराष्ट्रात १२ साखर कारखाने कार्य करीत होते.

भारतातील साखर कारखान्यांची मागील शतकातील प्रगती

वर्ष	कार्यरत साखर कारखान्यांची संख्या			साखर उत्पादन (लाख टनात)		
	खाजगी	सहकारी क्षेत्र	एकूण	खाजगी क्षेत्र	सहकारी क्षेत्र	एकूण
१९५०-५१	१३७	२	१३९	१०.९५	०.०५	११
१९६०-६१	१४४	३०	१७४	२५.७१	४.५०	३०.२१
१९७०-७१	१४२	७३	२१५	२४.७८	१२.६२	३७.४०
१९८०-८१	१६६	१४९	३१५	२२.४५	२९.०३	५१.४८
१९९०-९१	१६५	२२०	३८५	४७.७३	७२.७४	१२०.४७
२०००-०१	१७७	२५९	४३६	८०.१२	१०४.९९	१८५.११
२०१०-११	३०१	२२८	५२९	१३५.३८	१०८.५६	२४३.९४
२०१६-१७	२९९	१८८	४८७	१२७.९६	५६.५४	१८४.५

(स्रोत : Co-operative Sugar May, 2006 Vol. 37 / NFCFS)

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची प्रगती

तपशील	२०१२	२०१३	२०१४	२०१५	२०१६	२०१७
१. नोंदणीकृत सहकारी कारखाने संख्या	२०२	२०२	२०२	२०२	२०२	१७९
२. चालू कारखाने संख्या	११९	१०८	९६	९९	९९	८७
३. सभासद (००)	२४,१८०	२४,५००	२६,३४०	२५,१६०	२५,५५०	२६,७७०
४. राज्य शासनाचे भांडवल (रु. कोटीत)	१०७६	१२११.६९	१२४४.३०	१२५३.८३	१२८४.०७	१२९९.९७
५. प्रतिदिन गाळप क्षमता (लाख मे. टन)	३.४	३.३४	३.२२	३.४	३.५२	३.१४
६. हंगामात गाळप झालेला ऊस (लाख मे. टन)	५९१.४	५०४.६३	४८६.७२	५८९.४७	४८३.४९	२६८.२
७. साखर उत्पादन (लाख मे. टन)	६९.४	५८.४०	५६.५२	६७.७९	५५.८१	३०.६५
८. सरासरी उतारा (%)	११.७	११.५७	११.६१	११.५	११.५५	११.४३
९. ऊस खरेदी किंमत (सरासरी प्रति मे. टन)	१७००	१७००	२१००	२२००	२३००	२३००
१०. आसवनी प्रकल्प असणारे कारखाने	६८	६८	६९	६९	६९	६९
११. सहवीज प्रकल्प असणारे कारखाने	३७	३९	४६	४७	५१	५७
१२. तोट्यातील कारखाने	३५	३८	२९	६०	१०२	११७

स्रोत : साखर आयुक्त, महाराष्ट्र शासन (आर्थिक पाहणी अहवाल)

वरील आकडेवारीचा एकत्रित विचार करता भारतातील सहकारी साखर क्षेत्रातील फार मोठा हिस्सा महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीने व्यापलेला दिसतो आहे. देशात १९५० च्या दशकात केवळ २ सहकारी क्षेत्रातील साखर कारखान्यांची संख्या आज २०१६-१७ मध्ये १८८ झालेली आहे. यातही हा आकडा मागील काही दशकातील आकड्यांकडे पाहता घटच दर्शवितो आहे. सहकारी क्षेत्रांतर्गत झालेल्या साखर उत्पादनातसुद्धा मागील दशकात फार मोठी घट झालेली दिसते आहे. एकूणच साखर कारखानदारीमध्ये खाजगी क्षेत्र वरचढ ठरत आहे.

साखर कारखान्यांनी दिलेल्या ऊस खरेदी किमतीचा विचार करता त्यामध्ये सातत्याने वाढ झालेली दिसून येत असून, प्रतिवर्षी साखर कारखान्यांच्या हंगामात ऊसदर हा प्रकर्षाने वादग्रस्त मुद्दा ठरताना दिसतो आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत समाधानकारक ठरणारी एकच बाब म्हणजे अनेक कारखाने पर्यायी उत्पन्न स्रोतांचा वापर करताना दिसून येत असून केवळ साखर उत्पादनाद्वारे मिळणाच्या उत्पन्नावरच त्यांनी दिलेला भर कमी होताना दिसतो आहे. महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखान्यांनी बगॅसपासून कागदनिर्मिती तसेच पार्टिकल बोर्ड तयार करण्याचे कारखाने सुरू केले आहेत. याबरोबरच आसवनी अथवा डिस्टीलरी असणाऱ्या तसेच सहवीज निर्मिती प्रकल्प राबविणाऱ्या कारखान्यांची संख्या सातत्याने वाढ दर्शविते आहे.

सहकारी साखर कारखानदारीसमोरील आव्हाने

(Problems Faced by Sugar Co-operatives)

१. भ्रष्टाचार :

भारतातील सहकारी साखर कारखाने भ्रष्टाचाराने बरबटले असल्याचे दिसून येतात. साखर कारखान्यांनी लहान उत्पादकांच्या हिताची जपणूक करावी ही अपेक्षा असली तरी कारखान्यांची सत्ता ही मोठ्या उत्पादकाकडे असल्याचे दिसते. सत्तेचा वापर स्वहितासाठी आर्थिक लाभासाठी आणि राजकीय स्वार्थासाठी होत असल्याचे दिसते.

२. व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव :

भारतात सहकारी साखर कारखानदारीचा विकास शासकीय पाठिंबा आणि मदतीवर झाला आहे. २१ व्या शतकात स्पर्धात्मक परिस्थिती आणि जागतिकीकरणामुळे व्यावसायिक व्यवस्थापनाची आवश्यकता वाढली आहे. सहकारी साखर कारखानदारीच्या व्यवस्थापनात कमी शिक्षित आणि अपुन्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा भरणा आहे. त्यामुळे साखर उद्योगात व्यावसायिकतेचा अभाव जाणवतो. साखर कारखानदारी ही आर्थिक बेशिस्त, अव्यावसायिकता आणि पारदर्शकतेचा अभाव अशा सापळयात सापडली आहे. गुजरातमध्ये सहकारी अमूल डेअरी व्यवसायात व्यावसायिकता दिसून येते, तशी व्यावसायिकता सहकारी साखर उद्योगात येणे आवश्यक आहे.

३. साखर किंमत आणि कर्ज यातील तफावत :

साखर कारखाने शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी करून त्यांचे साखरेत रूपांतर करतात आणि साखर जिल्हा बँकांकडे तारण ठेवून कर्ज घेतात. या कर्जातून शेतकऱ्यांना उसाची किंमत भागवतात. उसाची भागविलेली किंमत आणि साखर निर्माण करण्याचा खर्च एकत्रित केल्यास तो कर्ज रकमेच्या अधिक होतो. साखरेला मिळणारा दर कमी असल्याने साखरेची किंमत आणि कर्ज यातील तफावत वाढते. साखर कारखान्यांना दुसरीकडून कर्जे घ्यावी लागतात.

४. साखरेच्या किमतीतील तफावत :

साखर कारखान्यांना मिळणाऱ्या साखरेच्या किमतीत बराच फरक पडत असल्याचे दिसते. १९७० नंतर उसाचे प्रमाण आणि साखरेचे उत्पादन वाढले. साखर कारखानदारीचा विकास झाला. परंतु भारतात साखरेच्या खपात ४ ते ५ टक्के वाढ दिसून येते. साखरेचे मोठे उत्पादन झाले तरकिमती कमी होतात. ऊस उत्पादक उसाला चांगला भाव मिळेल म्हणून उसाखालचे क्षेत्र वाढवतात. परंतु साखरेचे भाव पडल्याने साखरेस आणि उसाला चांगली किंमत मिळाली नाहीतर पुढील वर्षी उसाऐवजी दुसरे पीक घेतात. सरकारच्या साखर निर्यातीच्या धोरणातही सुसंगतता नसते. गेल्या काही वर्षांत ऊसदर आंदोलनामुळे साखर उद्योगापुढील समस्या वाढत आहेत.

५. निसर्गाचा लहरीपणा:

भारत हा उष्ण कटिबंधात येतो. त्यामुळे पावसाचा लहरीपणा दिसून येतो. नैसर्गिक बदलामुळे उसाखाली असलेल्या क्षेत्रात बदल होतो. त्यामुळे साखर उद्योग हा उसाचा अपुरा पुरवठा आणि अतिरिक्त ऊस उत्पादन या चक्रात सापडला आहे. साखर उत्पादन वाढले तर साखरेच्या किमती पडतात. त्यामुळे ऊस उत्पादकांची देणी भागविली जात नाहीत. ऊस उत्पादकांनी पिकात बदल केला तर उसाचा पुरवठा कमी होतो आणि साखर उत्पादन घटते आणि किमती कमी होतात.

६. आधुनिकीकरणाची गरज

भारतातील बरेच साखर कारखाने जुने असून जुन्या यंत्राच्या आधारे साखर उत्पादन केले जाते. त्यांच्या खर्चाचे प्रमाण अधिक आहे. जुन्या साखर कारखान्यांनी यंत्रे आणि तंत्रात बदल करणे गरजेचे आहे. त्यासाठी वित्त उभारणी ही मोठी समस्या आहे. या कारखान्यांचे अंतर्गत वित्तीय स्त्रोत नाहीत आणि कर्जबाजारीपणामुळे नवीन कर्जे उभारता येत नाहीत. जुन्या तंत्रामुळे •साखर उतारा, साखर उत्पादन यावर वाईट परिणाम होत आहे. या कारखान्यांना कर्ज प्राप्तीचे निकष पूर्ण करता येत नाहीत. त्यामुळे राज्य साखर विकास निधीतून कर्जे मिळू शकत नाहीत.

७. सतत वाढणाऱ्या व्याजाचा डोंगर

साखर कारखाने हे हंगामी कार्य करणारे उद्योग असून त्यांचे कामकाज वर्षातून १६५ दिवस व्हावे लागते. कारखाने उसावर प्रक्रिया करून साखर निर्माण करतात आणि उत्पादन खर्च वजा जाता साखरेची येणारी किंमत ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांना उसाची किंमत म्हणून परत केली जाते. कारखान्यांना हंगामापूर्वी कार्यकारी भांडवल उभारावे लागते. त्यासाठी जिल्हा बँक, राज्य बँक आणि नाबार्डकडून कर्ज घेतले जाते. त्यावर १३ टक्के ते ४ टक्के व्याज द्यावे लागते. व्याजाचा दर परवडत नसतानाही कर्ज घ्यावे लागते. कर्ज आणि व्याज वर्षानुवर्षे साठत जाते आणि कारखाने आजारी होतात.

८. खाजगीकरणाची भीती :

सहकारी साखर कारखान्यांचे खाजगीकरण होणे हे एक नवे आव्हान सहकारी साखर कारखानदारीपुढे निर्माण झाले आहे. सहकारी कारखाने आजारी झाले की ते अवसायानात काढले जातात आणि त्याचा लिलावकेला जातो. खाजगी उद्योजक हे कारखाने लिलावात घेऊन चांगले चालवून दाखवितात. यामुळे सहकारी क्षेत्रातील कारखान्यांची खाजगीकरणाकडे वाटचाल सुरू आहे असे म्हणता येते.

९. ऊस टंचाई :

साखर कारखान्यांना सतत ऊस टंचाई जाणवते. उसाला चांगला भाव मिळाल्यास शेतकरी उसाचे क्षेत्र वाढवितात नाहीतर ते पीक बदलतात. नैसर्गिक बदलामुळे ऊस उत्पादनाच्या प्रमाणात सतत बदल होतो. ऊस उत्पादकांचा भाव वाढवून मिळण्याच्या अपेक्षा असतात. त्यामुळेही ऊस पुरवठ्यात अडचणी येतात. साखर कारखाने अपेक्षेप्रमाणे १६५ दिवस काम करू शकत नाहीत.

१०. अन्य समस्या सहकारी साखर कारखान्यांपुढे पुढील अन्य समस्या जाणवतात.

(अ) साखर निर्यात धोरणात सतत होणारे बदल

(ब) साखर उद्योग अनियंत्रित करण्यात सरकार करीत असलेली चालढकल

(क) साखर कारखानदारीवरील करांचे प्रमाण

(ड) अधिक सेवकवर्गाचा भरणा

(इ) ऊस तोडणीसंबंधी येणाऱ्या अडचणी.

(फ) आंतरराष्ट्रीय बाजारातील साखरेच्या किमतीत सातत्याने होणारे तीव्र चढ-उतार.

सहकारी साखर कारखानदारीपुढील आव्हानांवरील उपाययोजना

(Remedies to Problems)

(अ) धोरणात्मक उपाय

१. आयात होणाऱ्या कच्च्या साखरेवर ६० टक्क्यांपर्यंत आयात कर लावणे.

२. देशात रिफाईन्ड साखर विक्रीवर बंदी घालणे.

३. शासनाने खुल्या बाजारातून लेव्ही साखर खरेदी करून सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे तिचे वाटप करावे.

४. साखर निर्यातीसाठी प्रोत्साहन देणे..

५. शासनाने इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळण्यासाठी निश्चित धोरण राबविणे.

६. सरकारने साखर उद्योगाबाबतचे किंमत धोरण सतत बदलू नये.

७. साखर उद्योग अनियंत्रित करण्याबाबत सत्वर निर्णय घ्यावा.

(ब) अंतर्गत उपाय

साखर उद्योगासाठी खालील उपाय सुचविले जातात.

१. नफ्याची पुनर्गुंतवणूक करण्याचे धोरण प्रत्येक कारखान्याने राबवावे.

२. साखर कारखान्यांनी अतिरिक्त नोकरभरती करू नये.

३. प्रत्येक कारखान्याने कर्मचारी पुनर्कार्यप्रवण (ERP) तंत्र वापरावे.

४. कारखान्यांनी खरेदी पद्धत, निधी उभारणी, संशोधन आणि विकास, कर्मचारी प्रशिक्षण आणि भांडार नियंत्रण यासाठी व्यवस्थापकीय तंत्रे वापरावीत.

५. प्रत्येक कारखान्याने इथेनॉल, स्पिरीट, कागद इत्यादींचे उत्पादन हाती घ्यावे. त्यामुळे वित्तीय स्थिती बळकट होईल.

६. पुरेसा ऊस पुरवठा व्हावा यासाठी प्रत्येक साखर कारखान्याने ऊस लागवडीसाठी नवीन तंत्रज्ञान स्वीकारावे आणि ते ग्रामपातळीपर्यंत पोहोचवावे.

७. ऊस तोडणीसाठी यंत्रांचा वापर करावा.

८. सहकारी साखर कारखान्यांचे महामंडळात रूपांतर करावे.

९. कारखान्यातून संगणकाचा वापर वाढवावा.

१०. कारखान्यांनी पाच, दहा किलोपर्यंतची साखर पॅकेट तयार करून प्रत्यक्ष ग्राहकांना विकण्याची व्यवस्था करावी.